# Mukt Shabd

# UGC CARE JOURNAL

ISSN NO : 2347-3150

MUKt SHABd JOURNAL

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission
Approved Journal List

Impact Factor : 4.6

A Peer Reviewed/ Referred Journal

Edited By
MSJ : Mukt Shabd Journal
http://shabdbooks.com/

Copyrights @ 2020 MSJ: All Rights reseved.

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College
Desaiganj (Wadsa) Dist. Gadchiroli

# सोशल मीडियाचा विद्यार्थ्यांच्या अभ्यास प्रवृत्तीवर झालेला परिणाम

**निलेश देवाजी हलामी**

सहाय्यक प्राध्यापक

आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय देसाईगंज जि गडचिरोली (म. रा.)

**सारांश:** -

*जगभरातील तरुण पिढीमध्ये सोशल मीडिया वेगाने वाढत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सोशल मीडिया वापरण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम झाला आहे. वेळेचे दुरुपयोग, खराब व्याकरण आणि चुकीचे शब्दलेखनाची सवय सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांवर होत आहे. विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचे एक प्रकारचे व्यसन लागल्यामुळे नेहमी कोणत्या ना कोणत्या सोशल मीडियावर असल्यामुळे त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होतो. विद्यार्थी त्यांचा अभ्यासाचा बराच वेळ व्यतीत करतात. विद्यार्थ्यांच्या अभ्यास प्रवृत्तीवर सोशल मीडियाचा कसा परिणाम झाला. या अभ्यासाचा परिणामाची मूल्यांकन करण्यासाठी गुणात्मक दृष्टिकोन बाळगण्यात आली. या प्रस्तुत शोधनिबंधात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून सोशल मीडियामुळे त्यांचा अभ्यासाच्या प्रवृत्तीमध्ये काय बदल झाले याबद्दल त्यांच्याकडून प्रतिसाद मागविण्यात आले. अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, सोशल मीडियाचा वापर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात होत असून त्याचा उपयोग शैक्षणिक माहिती मिळविण्यासाठी केला जातो. हे या प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्यात आला आहे.*

**मुख्य शब्द** :- इंटरनेट, सोशल मीडिया, अभ्यासप्रवृती, शैक्षणिक कामगिरी

प्रस्तावना:-

इंटरनेटवर ऑनलाइन असणारा, अनेक लोकांशी संपर्क साधून देणारा व ते जपून ठेवणारा मंच म्हणजे सोशल नेटवर्क सेवा. सोशल नेटवर्क अर्थात सामाजिक जाळे म्हणजे असे समूह जिथे सारख्या विचारांची, सारख्या आवडीनिवडींची माणसे एकत्र येतात. ह्या संज्ञेमध्ये प्रत्यक्ष मुलाखत अथवा थेट संवाद अपेक्षित असले तरी ही संज्ञा इंटरनेटवरील सेवेसही लागू पडत असते. विविध संकेतस्थळांच्या मार्फत ही सेवा इंटरनेट पुरवत असते. अशा प्रकारच्या संकेतस्थळांना सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे असे संबोधले जाते. सोशल नेटवर्किंग व संकेतस्थळे ह्या व्याख्या बरेचदा समानार्थी वापरल्या जाते. सोशल नेटवर्किंग या शब्दामध्ये अनोळखी व्यक्तीसोबतच नाते जोडणे अपेक्षित असते तर सोशल नेटवर्क या शब्दाचा अर्थ व्यापक स्वरूपाचा असुन ह्यात ज्या व्यक्तींशी ओळख असते अशाच व्यक्तींशी देखील इंटरनेटवर नाते जोडणे अपेक्षित असते.

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa)

सोशल मीडियाचा वापर मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर होत असतांना दिसतो. काम करणाऱ्या लोकांकडून ते केवळ वापरली जात नाही तर विद्यार्थी, शैक्षणिक संस्था यांच्या मध्ये सोशल मीडियाच्या वापरामध्ये देखील प्रचंड वाढ झाली आहे. सामाजिक नेटवर्कींग फेसबुक, व्हाटस्अप, इन्स्टाग्राम, युट्यूब व ट्विटर यासारख्या साइट्स आपल्याकडे असलेल्या संप्रेषण तंत्रज्ञानाची नवीनतम उदाहरणे आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी यासारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा मोठ्याप्रमाणात वापर करताना दिसतात. तासनतास मित्र, नातेवाईकासोबत चाटिंग करित बसने नवनवीन मित्र शोधणे व मनोरंजन करित बसणे ईत्यादी सोशल मीडियावर असल्यामुळे एक प्रकारचे व्यसन लागलेला असतो. तर काही विद्यार्थी सोशल मीडियाचा मदतीने शैक्षणिक साहित्य, अभ्यासक्रम पूरक माहिती मिळवत असतात.

आपला दैनंदिन जीवनाचा एक भाग म्हणून जर सोशल मीडियाचा सकारात्मक वापर केला गेला तर ते विद्यार्थ्यांना मदत ठरु शकतात आणि विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक कामगिरी सुधारण्यासाठी, नवीन-नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी सोशल मिडियाचा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे सोशल मीडियाचा विद्यार्थ्यांच्या अभ्यास प्रवृत्तीवर काय परिणाम होतो हे बघणे आवश्यक आहे. हे स्पष्ट आहे की सोशल मीडियाचा वापर आता रोगाचे रूप घेत आहे. तथापि, आज लोकांसाठी सोशल मीडिया अत्यंत आवश्यक झाला आहे यात काही शंका नाही, परंतु त्यातील दुसरे पैलू म्हणजे ते टाळणे आवश्यक आहे कारण जेव्हा जेव्हा कोणत्याही गोष्टीचा गैरवापर होऊ लागतो तेव्हा तो वरदान बनत नाही.

**संशोधन उद्देश**: -

1. सोशल मीडियाचा वापर आणि वेळ यांच्या दरम्यान मानसिक संबंधांचा अभ्यास करणे.
2. सोशल मीडियामध्ये तरुणांच्या सहभागाच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.
3. सोशल मीडियाचा वापरामुळे अभ्यासाच्या प्रवृत्तीवर झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**: -

**ऑनलाइन प्रश्नावली**: -

संशोधन आणि सर्वेक्षण क्षेत्रात सामग्री गोळा करण्यासाठी देखील प्रश्नावली वापरली जाते. अभ्यासाचे मूळ उद्दीष्ट म्हणजे सोशल मीडियाच्या वापरानंतर अभ्यासाच्या प्रवृत्तीवर होत असलेल्या अभ्यासावर प्रकाश टाकणे. म्हणूनच, सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या महाविद्यालयातील बी. कॉम भाग 1, 2 व 3 मधील विद्यार्थ्यांचा अभ्यासाच्या उद्दीष्टांनुसार निवड केली गेली. उत्तर देणाऱ्यांच्या निवडीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. बोगार्डस यांनी प्रश्नावली परिभाषित केली. प्रश्नावली ही विविध व्यक्तींना उत्तरे देण्यासाठी

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

दिलेल्या प्रश्नांची एक सारणी आहे. प्रश्नावली शक्य तितक्या काळजीपूर्वक आणि पद्धतशीरपणे डिझाइन केल्या आहेत. संशोधनासाठी सामग्रीचे संकलन तितकेच उपयुक्त ठरते. प्रश्नावलीमध्ये, माहिती देणाऱ्यांना स्वतः च्या प्रश्नांची उत्तरे समजून घ्यावी लागतात. म्हणून, प्रश्नावली निर्मितीच्या वेळी माहिती देणाऱ्यांचा ज्ञानाचा आधार वाढवावा लागतो. यामध्ये संशोधकाची मदत घेतल्याशिवाय उत्तरे द्यावी लागतात. म्हणून, प्रश्नावलीचे बांधकाम इतके सोपे आणि स्पष्ट असले पाहिजे की प्रतिसादकर्ता ते सहज भरू शकेल आणि पाठवू शकेल. प्रश्नावलीची रचना तीन भागात विभागली जाऊ शकते. आज प्रश्नावलीच्या स्वरूपात मोठे बदल झाले आहेत.पुर्वीच्या प्रश्नावली पोस्ट मधून पाठविल्या गेल्या, पण आज आपण ई-मेलद्वारे प्रश्नावलीही पाठवू शकतो. ई-मेलद्वारे आम्हाला प्रश्नांची वेगवान उत्तरे मिळतात. आता आम्हाला आमच्या प्रश्नांची उत्तरे लवकरात लवकर मिळतात. सध्या इंटरनेट आणि तंत्रज्ञानाने प्रश्नावली आणखी सोपी केली आहे. बऱ्याच ऑनलाइन वेबसाइट्स आहेत ज्या ऑनलाइन प्रश्नावली करतात आणि त्यांची उत्तरे सहज प्राप्त होतात. या अभ्यासासाठी ऑनलाइन गुगल फार्म वेबसाइट सर्वेक्षणाची मदत घेण्यात आली. एकूण 86 उत्तरदात्यांना व्हॉट्सअप व ई-मेलद्वारे प्रश्नावली पाठविली गेली. प्रश्नावली मध्ये 10 प्रश्न विचारले गेले. गुणात्मक पद्धतीतून मिळालेल्या उत्तरांचे परिमाणात्मक विश्लेषण केले गेले आणि खालील कारणांवर दिले.

**प्रश्नावलीच्या सामग्री विश्लेषणाचा आधार**

**निकाल आणि चर्चा**

गुगल फार्म सर्वेक्षण व्दारे ऑनलाइन प्रश्नावली प्रश्नावलीच्या पद्धतीनुसार उद्देशपूर्ण पद्धतीने निवडलेल्या नमुन्यांकडे पाठविली गेली. प्रश्नावलीला उत्तर देण्यासाठी एकूण 86 जणांची निवड करण्यात आली. एकूण 10 प्रश्न निवडलेल्या उत्तरदात्यांकडून विचारण्यात आले आणि समस्येसंदर्भात विविध तथ्य एकत्रित केले. प्रश्नावलीद्वारे प्राप्त केलेली उत्तरे गुणात्मक स्वरुपात उपलब्ध होती, ज्याने परिमाणात्मक स्वरुप प्रदान करण्यासाठी सामग्री विश्लेषण पद्धतीचा वापर केला.


1. सोशल मीडिया वापरण्याबाबत मत?

एकूण 86 उत्तरदात्यांकडून प्रश्नावलीची उत्तरे ऑनलाइन सर्वेक्षण गुगल फॉर्म व्दारे प्राप्त केली गेली. सर्व उत्तरदात्यांची उपयुक्तता पातळी भिन्न भिन्न आहे. 79 टक्के उत्तरदात्यांचे असे म्हणणे आहे की,

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli


ISSN NO : 2347-3150




आकृती 1 उपयुक्तता वर्तन

ते व्हॉट्सअॅपचा वापरतात. तर 9 टक्के उत्तरदाते फेसबुक, 7 टक्के उत्तरदाते ब्लॉग व 5 टक्के उत्तरदाते इन्स्टाग्रामचा वापर करतात. यापैकी एकही लोकांचा उत्तरदाता व्टिटरचा वापर करित नाही.

2. आपण दिवसात किती किती मिनीटांनी किंवा तासांनी सोशल मीडिया साईटला भेट देता ?





आकृती 2 उपयुक्तता वेळ

गुगल फॉर्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदात्यांची उपयुक्तता पातळी भिन्न होती. 32 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की,ते दिवसातून दोन वेळा सोशल मीडिया साइट्स तपासतात. 30 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की,ते 1-1 तासांच्या अंतराने सोशल मीडिया साइट्स तपासतात. 26 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, ते 4 तासांत एकदा सोशल मीडिया तपासतात. तर 26 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, ते 30-30 मिनीटांत सोशल मीडिया तपासतात.

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist- Gadchiroli

3. सोशल मीडियाचा वापर करण्याआधी आपण किती तास अभ्यास करायचे ?




आकृती 3 शिक्षण उपयोगिता

सर्व उत्तरदात्यांची अभ्यासासाठी लागणारा वेळ ही भिन्न भिन्न आहे. 25 टक्के उत्तरदात्यांचे असे म्हणणे आहे की, ते दररोज 1 ते 2 तासच अभ्यास करतात. 18 टक्के उत्तरदात्यांचे असे म्हणणे आहे की, ते दररोज 2 ते 4 तासच अभ्यास करतात. तर एकही उत्तरदाता 5 ते 10 तास किंवा 10पेक्षा जास्त तास अभ्यास करित नाही.

4. सोशल मीडियाचा वापर केल्यानतंर आपल्या अभ्यासाच्या सवयीमध्ये बदल झाला का ?





आकृती 4 अध्ययन प्रवृत्तीमध्ये बदल

गुगल फार्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदाते सोशल मीडियाचा वापर केल्यानतंर त्यांच्या अभ्यासाच्या सवयीमध्ये बदल हे भिन्न आहे. 74 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, त्यांच्या अभ्यास करण्याच्या सवयीमध्ये बदल झालेला आहे तर 26 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, त्यांच्या अभ्यास करण्याच्या सवयीमध्ये बदल झालेला नाही.

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

ISSN NO : 2347-3150


5. मोबाईल वर ऑनलाइन असतांना आपण फक्त सोशल मीडिया हि साईट बघता का? की इतर शैक्षणिक साईट सुध्दा बघता ?




आकृती 5 ऑनलाइन अध्ययन

गुगल फार्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदाते मोबाईल वर ऑनलाइन असतांना वेगवेगळया साईटला भेट देतात. 93 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, ते शैक्षणिक साईटस बघतात तर 7 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, ते फक्त सोशल मीडिया साईट बघतात.

6. सोशल मीडिया वापर करतांना आपल्या ज्ञानात वाढ होतो का ?




आकृती 6 ज्ञानात वाढ


गुगल फार्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदाते मोबाईल वर ऑनलाइन असतांना वेगवेगळया साईटला भेट देतात. 93 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, ते शैक्षणिक साईटस बघतात तर 7 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, ते फक्त सोशल मीडिया साईट बघतात.

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College

ISSN NO : 2347-3150




7. सोशल मीडिया व्दारे आपण काय काय शेअर करता ?




आकृती 7 शेअर प्रवृत्ती

गुगल फार्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदात्यांचे उपयोगिता स्तर भिन्न आहे. 2 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, सामान्य ज्ञान शेअर करतात तर 9 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, महत्वपूर्ण माहिती शेअर करतात. 5 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, शिक्षणासंबधीत माहिती शेअर करतात. 14 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, सुचना,शिक्षा व मनोरंजन माहिती शेअर करतात तर 70 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, सामान्य ज्ञान,महत्वपूर्ण माहिती, शिक्षणासंबधीत माहिती, स्वतःचे फोटो व सुचना, शिक्षा व मनोरंजन माहिती शेअर करतात

8. आपण एका महिण्यात किती इंटरनेट डाटा खर्च करता ?




आकृती 8 इंटरनेट डाटा खर्च


गुगल फार्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदात्यांचे उपयोगिता स्तर भिन्न आहे. 40 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, महिन्याला 30 जीबी इंटरनेट डाटा खर्च करतात. 9 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, महिन्याला 20 जीबी इंटरनेट डाटा खर्च करतात. 7 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की,

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College
Desaiganj (Wadsa) Dist- Gadchiroli

महिन्याला 15 जीबी इंटरनेट डाटा खर्च करतात.तर 44 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, महिन्याला 30जीबी पेक्षा जास्त इंटरनेट डाटा खर्च करतात.


9. आपण रात्री किती वाजेपर्यंत सोशल मीडियाचा वापर करता ?




आकृती 9 रात्री सोशल मीडियाचा वापर

गुगल फार्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदात्यांचे उपयोगिता स्तर भिन्न आहे. 91 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, रात्री 10 वाजेपर्यंत सोशल मीडियाचा वापर करतात. 9 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, रात्री 11 वाजेपर्यंत सोशल मीडियाचा वापर करतात.

10. सोशल मीडिया साईट व शैक्षणिक विशयी माहिती साईट यापैकी आपला अधिक वेळ कशात जातो?




आकृती 10 साईट उपयुक्तता वेळ

गुगल फार्म ऑनलाइन सर्वेक्षण वेबसाइटद्वारे एकूण 86 उत्तरदात्यांना प्रश्नावलीवर प्रतिसाद पाठविण्यात आले होते. सर्व उत्तरदात्यांचे उपयोगिता स्तर भिन्न आहे. 70 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, शैक्षणिक विषयी माहिती साईट बघण्यात जास्त वेळ जातो. तर 30 टक्के उत्तरदात्यांचा असे म्हणणे आहे की, सोशल मीडिया साईट बघण्यात जास्त वेळ जातो.

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

**निष्कर्ष:-**

वरील अभ्यासानुसार हे स्पष्ट झाले आहे की बहुतेक वापरकर्ते फेसबुक, ट्विटर, ब्लॉग, इंस्टाग्राम इत्यादी सोशल मीडिया नेटवर्किंग साइट्स वापरत आहेत. हे स्पष्ट झाले की फारच थोड्या विद्यार्थ्यांना मायक्रो-ब्लॉगिंग साइट ट्विटर वापरण्यास सक्षम आहे, बहुतेक सोशल मीडिया वापरकर्ते व्हॉट्सअॅपवर सक्रिय आहेत. अभ्यासात असे दिसून आले आहे की काही विद्यार्थी अर्ध्या-अर्ध्या तासानी सोशल मीडिया साइटला भेटी देतात. त्याच वेळी, जवळजवळ अर्ध्या विद्यार्थ्यांचा असा विश्वास आहे की ते सोशल मीडिया साइट्स 1-1 तासांच्या अंतराने तपासतात. सोशल मीडिया साइट वापरण्यापूर्वी ते अधूनमधून पुस्तके वाचत असत असा विश्वास असणाऱ्या एक तृतीयांश विद्यार्थ्यांचा असा विश्वास होता, पण आता .44.4 टक्के विद्यार्थ्यांचा असा विश्वास आहे की सोशल मीडियाचा वापर केल्यामुळे त्यांच्या वाचनाच्या सवयीवर परिणाम झाला आहे. ते पूर्वीपेक्षा कमी अभ्यास करत आहेत. शिवाय, काही विद्यार्थ्यांचे असे म्हणतात की सोशल मीडिया साइट वापरल्यानंतर त्यांना अजिबात वाचता येत नाही. विद्यार्थ्यांचा असा विचार आहे की सोशल मीडिया साइटने त्यांना पुस्तकांपासून दूर केले आहे. त्याचबरोबर अर्ध्याहून अधिक विद्यार्थ्यांना असे वाटते की सोशल मीडिया साइट्स वापरल्यामुळे त्यांची वाचनाची सवय कमी झाली आहे. वापरकर्त्यांपैकी एक चतुर्थांश इंटरनेट केवळ सोशल मीडिया वेबसाइटचा वापर करतात. त्याच वेळी, अर्ध्या विद्यार्थ्यांनी कबूल केले की ते सोशल मीडिया तसेच शैक्षणिक वेबसाइट्सद्वारे अभ्यास करतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून ज्ञान वाढविण्यामुळे बहुतेक विद्यार्थ्यांना विश्वास आहे की ते आपले ज्ञान वाढवित आहेत. सोशल मीडिया वापरकर्त्यांपैकी एक तृतीयांश ज्ञानपूर्ण माहिती सामायिक करतात. अर्ध्याहून अधिक विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की ते महत्वाची माहिती, शैक्षणिक पोस्ट, स्वतःचे फोटो, माहिती आणि करमणूक माहिती सर्व काही सामायिक करतात. आमचे तरुण एका महिन्यात सुमारे 30जीबी पेक्षा जास्त डेटा खर्च करतात, ही स्वीकृती टक्केवारी सुमारे 44.44 टक्के आहे. म्हणजेच, विद्यार्थ्यांमध्ये इंटरनेट वापराचा बराच डेटा वापरला जात आहे. सोशल मीडियावरील एक तृतीयांश वापरकर्त्यांचा असा विश्वास आहे की ते रात्री 10 वाजेपर्यंत ऑनलाइन राहतात. रात्री 12 वाजेपर्यंत सुमारे एक चतुर्थांश लोक त्यांचा वापर करतात. त्याचबरोबर काही लोक दुपारी एक वाजेपर्यंत सोशल मीडिया साइटवर अॅक्टिव्ह राहतात.

**संदर्भ:-**

1- Agwi Uche Celestine and Ogwueleka Francisca Nontelum, "Impact of social media on students academic performance" (2018). International journal of scientific & Engineering research volume 9 .

2- Mushtaq Ahmad Jahed, "The Effects of Social Media on the Undergraduate Students Academic Performances" (2018). Library Philosophy and Practice (e-journal).1779

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College, Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

3- Raymond Owusu Boateng & Afua Amankwaa, "The Impact of Social Media on Student Academic life in Higher education" (2016). Global journal of human social science valume 16 issue 4.

4- Gilbert M. Talaue, Ali Alsaad, Naif AlRushaidan, Alwaleed AlHugail, Saad AlFahhad, "The Impact of social media on academic performance of selected college students" (2018). International journal of information technology Vol.8.

5- डॉ. भांडारकर पु.ल., " सामाजिक संशोधन पध्दती (१९७६). महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती नागपूर

6- क्या सोशल मीडिया का उपयोग छात्र जीवन पर असर करता है-
https://gyanapp.in/hindi/questions/41901/%

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli